जनसामान्यांच्या मनातील आरसा

# वरूड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

Postal Lic./AMT/RNP/492/2023-2025

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वरुड | गुरुवार

२६.०३.२०२६

वर्ष: ०७ | अंक: ५४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## थोडक्यात

### महाराष्ट्र विधान परिषदेत मोठा खेला! उद्धव ठाकरेंची एंट्री होणार?

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** -राज्यसभेनंतर आता महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुकीची चर्चा होत आहे. राज्यसभेची हक्काची जागा सोडल्याने उद्धव सेनेत खडाजंगी झाल्याची चर्चा रंगत असतानाच आता विधान परिषदेसाठी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पुन्हा संधी देण्यासाठी फिल्डिंग लावण्यात येत आहे. १३ मे २०२६ रोजी विधान परिषदेच्या ९ जागा रिक्त होत आहेत. निवडणूक लवकरच होईल, पण त्यापूर्वीच सत्तेच्या सारीपाटावर गणितं मांडण्यात आली आहे. तर डावपेचही आखले जात आहेत. उद्धव ठाकरे यांच्यासह इतर आमदारांना विधान परिषदेतून निरोप देण्यात आला. त्यासाठी आयोजित समारोप कार्यक्रम चांगलाच रंगला.

# बांगलादेशात बस नदीत कोसळली : २३ प्रवाशांना जलसमाधी

### ईदच्या सुट्ट्या संपवून ढाका येथे परतणाऱ्या प्रवाशांवर काळाचा झडप : पद्मा नदीत बस कोसळल्याने किमान २३ प्रवाशांचा मृत्यू



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**ढाका** - ईदचा आनंद साजरा करुन आपल्या घरी परतणाऱ्या प्रवाशांसाठी बुधवारची संध्याकाळ घातकी ठरली. प्रवाशांनी भरलेली बस पद्मा नदीत कोसळल्याने किमान २३ प्रवाशांचा मृत्यू झाला असून, मृतांमध्ये लहान मुलांचाही समावेश आहे. ईदच्या सुट्ट्या संपवून ढाका येथे परतणाऱ्या प्रवाशांवर काळाने झडप घातली.

राजबारी जिल्ह्यातील दौलतडिया टर्मिनल येथे फेरीवर (नौकेवर) चढण्याचा प्रयत्न करत असतांना एक प्रवासी बस थेट खोल नदीत कोसळली. बुधवारी संध्याकाळी साधारण ५.१५ वाजता ही दुर्घटना घडली. प्रत्यक्षदर्शींच्या सांगण्यानुसार, ४० प्रवाशांनी भरलेली ही बस फेरीकडे जात असताना एका छोट्या बोटीला धडकली. या धडकेमुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस थेट पद्मा नदीच्या पात्रात कोसळली. बसमध्ये सुमारे ४० प्रवासी होते, जे ईदची सुट्टी साजरी करून राजधानी ढाकाकडे जात होते. अपघातानंतर घटनास्थळी मोठा हाहाकार माजला. खराब हवामानामुळे बचावकार्यात अडथळे येत होते. लष्कर, पोलीस, अग्निशमन दल आणि तटरक्षक दलाच्या पथकांनी मिळून बचावकार्य राबवले. सुमारे ६ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर क्रेनच्या साहाय्याने बसला नदीबाहेर काढण्यात आले. आतापर्यंत २३ मृतदेह बाहेर काढण्यात आले असून बेपत्ता प्रवाशांचा शोध अद्याप सुरु आहे.

मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नदी ओलांडताना फेरीवर चढताना होणारी घाई आणि सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन यामुळे अशा दुर्घटना वारंवार घडत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश बांगलादेश सरकारने दिले आहेत. ईदच्या सणानंतर आनंदाने घरी परतणाऱ्या कुटुंबांवर हा दुखाचा डोंगर कोसळल्याने संपुर्ण बांगलादेशात शोककळा पसरली आहे. अनेक कुटुंबे आपल्या बेपत्ता नातेवाईकांच्या शोधात नदीकाठी थांबुन आहेत.

# ऑन-ड्युटी जवानाने स्वत:वरच झाडल्या गोळ्या

### पोलीस आयुक्तालयात गोळीबार, आयुष्याची दोर कापली



(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**अमरावती** - शहर पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेल्या (क्युआरटी) शीघ्र कृती दलामधील एका जवानाने विजय दिलीप नागापुरे (वय ३५) यांनी काल बुधवारी रोजी सकाळी अत्यंत धक्कादायक पाऊल उचलत आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण पोलीस विभागात खळबळ उडाली असून सहकाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विजय नागापुरे हे मंगळवारी रात्री नाईट ड्युटीवर होते. ड्युटी पूर्ण केल्यानंतर काल बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास त्यांनी पोलीस आयुक्तालयातील क्युआरटी कार्यालयात स्वतःच्या शासकीय पिस्तुलातून डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, शाम घुगे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. या घटनेची माहिती सर्वप्रथम क्युआरटी मधील पोलीस कर्मचारी आकाश दिलीप अंबरते यांच्या लक्षात आली. त्यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळिवल्यानंतर संपूर्ण यंत्रणा हलली. घटनास्थळी फॉरेन्सिक टीम व डॉग स्कॉडला पाचारण करण्यात आले असून तपासाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. घटनास्थळावरून पिस्तुलमधील बुलेट जप्त करण्यात आली आहे.

मृतदेह पुढील तपासासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. विजय नागापुरे हे मूळचे मोर्शी तालुक्यातील धामणगाव काटपूर येथील रहिवासी होते. सध्या ते अमरावती शहरात कुटुंबासह राहत होते. ते २०१४च्या बॅचमध्ये पोलीस खात्यात रुजू झाले होते. त्यांच्या पश्चात कुटुंबीय असून त्यांचा भाऊ शाम नागापुरे हे देखील शहर पोलीस दलात कार्यरत आहेत. दरम्यान, आत्महत्येमागील नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नसून पोलीस विभागाकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरु आहे. या दुर्दैवी घटनेमुळे पोलीस दलात शोककळा पसरली आहे.

# रेती तस्करी करणारा टिप्परसह २५ लाखांचा मुद्देमाल जप्त

### बेनोडा परिसरात पोलिसांची मोठी कारवाई

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**वरूड** - गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून विनापरवाना रेतीची तस्करी करणाऱ्या एका १० चक्का टिप्परवर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, मुख्य मालक फरार होण्यात यशस्वी झाला आहे.

मिळालेल्या गुप्त खबरीवरुन पोलीस कर्मचाऱ्यांनी नाकाबंदी केली होती. यावेळी संशयास्पद वाटणारा अशोक लेलँड कंपनीचा १० चक्का एम.एच.४० सीडी ६२०० थांबवुन त्याची झडती घेतली असता त्यामध्ये अवैधरित्या भरलेली रेती आढळून आली. सदर रेतीची वाहतूक विनापरवाना आणि विनारॉयल्टी केली जात होती. या प्रकरणी पोहेकॉ.निलेश नारायण डांगोरे यांचे फिर्यादीवरुन बेनोडा पोलिसांनी गोपाल तेजसींग उईके (४८) रा.पुसला याला ताब्यात घेतले असून निखील सुर्यभान धुर्वे (२१), रा.बेनोडा बांबल, फरार मालक स्वराज यांचे विरुध्द ३०३ (२) २८१, १२५, ४९ बिएएस सह कलम १८४ मो.वा.का.सह कलम अधि कलम ९,१५ सह कलम.ज.म. सं १९६६ कलम ४८ (७), ४८ (८) तसेच सार्व.संपत्ती नुकसान प्रति अधि १९८४ कलम ३, ७ कलम ३७९,२७९, ३३६,१०९ दाखल केला आहे. फरार आरोपीचा शोध पोलीस घेत आहेत.

### उपविभागीय कार्यालयात धाडसी चोरी

# कपाटातील सव्वातीन लाखांची रोकड लंपास

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**वरूड** - येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयामध्ये अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी कार्यालयाचे शटर उघडून आतील लोखंडी पेटीतून ३ लाख २२ हजार ७४० रुपयांची रोख रक्कम आणि एक धनादेश लंपास केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही चोरी २३ मार्चच्या सायंकाळी ७ वाजतापासून ते २४ मार्चच्या सकाळी १० वाजताच्या दरम्यान घडली. अज्ञात चोरट्यांनी कार्यालयात प्रवेश करुन लाकडी कपाटात ठेवलेली लोखंडी पेटी उघडली. या पेटीत असलेली ३ लाख २२ हजार ७४० रुपये रोख आणि ३५ हजार ८४० रुपये नमुद असलेला एक धनादेश असा ऐवज चोरुन नेला.

याप्रकरणी अभिजित अरविंद फरकाडे (वय ५३) रा.शेघाट यांनी दिलेल्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु केला आहे.









कँट व वरुड व्यापारी संघाचे

# आगार व्यवस्थापक आकाश तागडे यांना निवेदन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड –** वरुड व्यापारी संघ, कन्फेडेरेशन ऑल इंडिया ट्रेडर्स, भाजपा व्यापारी आघाडी, सी पी डी.ए.च्यावतीने एस.टी.महामंडळाच्या आगार व्यवस्थापक आकाश तागडे यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात वरुड ते रामटेक मार्ग काटोल, सावनेर ते खापा ते रामटेक या मार्गावर बस सुरु करण्यात यावी, वरुड ते शेगाव, वरुड ते नांदेड, वरुड ते परतवाडा बस सुरु करण्याची मागणी तसेच वरुड आगारामध्ये व्यापारी संकुल करावे, अशी मागणी सुध्दा करण्यात आली.

याप्रसंगी वरुड व्यापारी संघाचे व कँटचे अध्यक्ष गिरिधर देशमुख, भाजपा व्यापारी आघाडी अध्यक्ष जगदीश उपाध्याय, वरुड व्यापारी संघाचे उपाध्यक्ष रमेश हुकुम यांनी आगार व्यवस्थापक आकाश तागडे यांच्याशी सविस्तर चर्चा केली व समस्याचे समाधान झाले. यावेळी विभागीय नियंत्रक यांना ही कळविण्यात आले.

'बेस्ट अग्रीकल्चरलं इनोव्हेशन अवॉर्ड ऑफ द ईअर' अवार्डने

# मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य खेरडे होणार सन्मानित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड –** हॉटेल प्राईड नागपुर थे एएन सी ट्रान्सफॉरमेशनस व एस सी.डी.आर प्राक्हेट लिमीटेड यांनी आयोजीत केलेल्या संमारंभामध्ये अर्जुना अँग्रो कंपनीचे निर्माते व मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य खेरडे यांना बेस्ट अॅग्रीकल्चरलं इनोवेशन अवॉर्ड ऑफर ईअर २०२६ ने सन्मानित करण्यात येणार आहे. अजिंक्य खेरडे यांनी स्वतःच्या शेतात मोरिंगा, लक्ष्मीतरु, बीट रुटची लागवड केली व विशिष्ट प्रशिक्षण घेवुन विविध वनस्पतीचे सुकवुन पावडर तयार करुन अर्जुना अँग्रो कंपनी स्थापन केली व भारतातील मोठ्या शहरांत मध्ये विक्री तसेच अॅमेझोन वरुन विक्री केली. शेतकयांना स्वतःच्या मालाची किंमत स्वतः ठरविता यावी तसेच ग्रामिण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध होईल, या हेतूने उचललेले पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. ते स्वत:सॉफ्टवेअर इंजिनिअर असून कॉर्पोरेट जगतातील नोकरी सोडून शेतीला उद्योगाचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी तरुण पिढीतील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात.

त्यांनी निवडलेल्या या पिकांना कोणत्याही रासायनीक खत किंवा फवाऱ्याचीची अतिरिक्त आवश्यकता नाही, ज्यामुळे उत्पादन खर्चात होणारी बचत ही निव्वळ नफ्याच्या स्वरुपात वृद्धींगत होणार आहे.

जनता इंग्लिश स्कूलमधील

# इंडियन टॅलेंट ऑलिंपियाडमध्ये विद्यार्थ्यांचे यश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट –** जनता इंग्लिश स्कूल येथील विद्यार्थ्यांनी सत्र २०२५-२६ मध्ये आयोजित इंडियन टॅलेंट ऑलिंपियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेच्या पहिल्या फेरीत एकूण ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी २० विद्यार्थी पुढील फेरीसाठी पात्र ठरले.

पहिल्या फेरीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या टॉपर विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता २ रीचा चैतन्य ठमके तसेच इयत्ता ३ री तील सृष्टी चौधरी, स्वरा गोरडे आणि प्रियल पुरी यांचा समावेश आहे. दुसऱ्या फेरीत राज्य स्तरावरही विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. राम पंकज आंडे याने राज्य स्तरावर ७ वा क्रमांक मिळवित ७००रुपयांची शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. तसेच कृपा अमोल काळे हिने एक्सलन्स मेडल अवॉर्ड पटकावून शाळेचा गौरव वाढवला आहे.

या यशाबद्दल जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जगदीश काळे, उपाध्यक्ष अरुण काळे. सतीश सोलाव, सचिव मोहन गाणोरकर, सहसचिव चंद्रशेखर टाकरखेडे, संचालक अरुण फुटाणे, राजेंद्र बेलसरे आणि अॅड.प्रभाकर सावरकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. मुख्याध्यापिका जयश्री आंडे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

# राम नवमीनिमित्ताने आज वाहतुकीत मोठे बदल

दुपारी ४ ते १० वाजेपर्यंत काही रस्ते बंद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**पुणे –** रामनवमीनिमित्त शहरात निघणाऱ्या मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले आहेत. सायंकाळी चार ते रात्री दहा या वेळेत अनेक प्रमुख रस्त्यांवर वाहतूक वळिवण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी नियोजन करुनच प्रवास करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे. बाजीराव रस्ता आणि लष्कर परिसरात मिरवणुका निघणार असल्याने विश्रामबाग आणि लष्कर वाहतूक विभागाच्या हद्दीत आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने वाहतूक बंद किंवा वळवली जाणार आहे. अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता इतर वाहनांना निर्बंध लागू राहतील. विश्रामबाग विभागात पुरम चौकातून बाजीराव रस्त्याने शिवाजीनगरकडे जाणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद केला जाणार आहे.

ही वाहने टिळक रस्त्याने वळवून पुढे अलका टॉकीज चौक आणि खंडुजी बाबा चौक मार्गे सोडण्यात येणार आहेत. लष्कर भागात वाय जंक्शनहून एमजी रोडकडे येणारी वाहतूक थांबविण्यात येणार आहे. मिरवणूक पुढे सरकत राहिल्यानुसार १५ ऑगस्ट चौक, महमंद रफी चौक आणि कोहिनूर हॉटेल परिसरात टप्प्याटप्प्याने वाहतूक वळवली जाणार आहे. काही ठिकाणी वाहतूक पूर्णपणे बंद ठेवून ती ईस्ट स्ट्रीट, भोपळे चौक, कुरेशी मशीद आणि सेंटर स्ट्रीट मार्गे सोडण्यात येणार आहे. टिळक स्मारक ते पेरुगेटमार्गे नारायण पेठेकडे जाणारा रस्ता रामनवमीच्या कार्यक्रमाच्या तयारीसाठी पूर्वसूचना न देता अचानक बंद करण्यात आल्याने नागरिकांची गैरसोय झाली. बुधवारी दुपारी साडेबारा ते एकच्या दरम्यान हा रस्ता सुरुवातीलाच अडविण्यात आला होता, मात्र याबाबत संबंधित यंत्रणांकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही.

या प्रकाराबाबत वाहतूक पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी ठोस स्पष्टीकरण देण्याचे टाळले. स्थानिक पोलिसांकडे विचारणा केली असता, 'कार्यक्रमासाठी परवानगी दिली आहे; मात्र वाहतूक बंद करण्याचा अधिकार वाहतूक पोलिसांकडे आहे,' असे सांगण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात रस्ता बंद करण्यात आला असताना जबाबदारी नेमकी कोणाची, यावरच प्रशासनातील संभ्रम उघड झाला.

# इंधन संपण्याच्या अफवांनी पेट्रोल पंपावर वाहनधारकांची गर्दी




अफवांवर विश्वास न ठेवण्याचे प्रशासनाचे आवाहन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड –** आखाती देशांमधील युद्धामुळे इंधनाचे दर वाढण्याची किंवा इंधन संपण्याची अफवा पसरल्याने शहरांत तसेंच तालुक्यातील पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अशातच काही पेट्रोल पंपावरील इंधन संपल्याने कोरडे पडले होते.दरम्यान तालुक्याला पुरेसे असल्याचे तहसील प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

आखाती देशात युद्ध सरु झाल्याने पेट्रोल बंद होणार असल्याच्या भीतीपोटी वाहनधारकांनी काल मंगळवारी रात्रीपासून पेट्रोल पंपांवर मोठी गर्दी केली आहे. गाडी फुल करून अनेक जण जमेल तसं पेट्रोल साठवून ठेवण्याचा प्रयत्न करत होते. कुणी म्हणत आहेत की, पेट्रोल बंद होणार आहे, तर कुणाला पेट्रोल महाग होणार असल्याची माहिती मिळाल्याने ही गर्दी झाली झाल्याचे सांगितले जाते.शहरातील बहुतांश भागातील पेट्रोल पंपांवर रांगा लागल्या होत्या.


या रांगांमुळे अनेक ठिकाणी वाहतूक जाम झाली होती. महात्मा फुले चौकातील पेट्रोल पंपावर आणि पांढुर्णा चौकातील पेट्रोल पंपांवर वाढलेल्या गर्दीमुळे पोलिस बंदोबस्त लावावा लागला होता तसेंच तालुक्यातील इतर पेट्रोल पंपावर सुद्धा वाहणांची गर्दी झाली होती. दरम्यान तालुक्यात इंधन तुटवडा निर्माण झाल्याची अफवा काही ठिकाणी पसरत आहे. त्यामुळे तालुक्यात कार्यरत सर्वसाधारणपणे सर्वच पेट्रोल पंपावर अतिरिक्त स्वरुपामध्ये वाहनांमध्ये इंधन साठा करणेसाठी गर्दी होऊन पेट्रोल पंपावर वाहनांची गर्दी निर्माण होत आहे.

तालुक्यात पेट्रोल व डिझेलचा साठा सद्यस्थितीमध्ये पर्याप्त प्रमाणामध्ये उपलब्ध असून इंधन पुरवठा सुरळीत सुरू आहे. सर्वच पेट्रोल पंप कंपनीच्या विक्री अधिकारी व प्रतिनीधी यांना प्रशासनाच्या मार्फत इंधन पुरवठा सुरळीत ठेवणे कामी आवश्यक त्या सुचना जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांचे कडून देण्यात आलेल्या आहेत. तालुक्यात कोणत्याही प्रकारचा इंधन तुटवडा नाही. सर्व पेट्रोल पंपांवर नियमितपणे इंधनाचा पुरवठा केला जात आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरुन जाऊन पेट्रोल पंपावर अनावश्यक गर्दी करणे योग्य होणार नाही, अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीसाठी तालुका प्रशासनाशी संपर्क साधावा. चुकीची माहिती पसरविणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार रामदास शेळके यांनी केले आहे.

# ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ.जयसिंगराव पवार यांचे निधन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मराठेशाहीचा इतिहासकार हरपला



**कोल्हापूर –** ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ.जयसिंगराव पवार यांचं निधन झालं. गुरुवारी पहाटेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. वयाच्या ८५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे खंदे पुरस्कर्ते म्हणुन डॉ.जयसिंगराव पवार यांची ओळख होती.

गेल्या काही दिवसांपासून डॉजयसिंगराव पवार यांची प्रकृती अस्वस्थ होती. फुफ्फुसाच्या संसर्गामुळ जवळपास दीड महिन्यांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचारही सुरु होते. गुरुवारी पहाटेच्या सुमारास त्यांनी कोल्हापुरात अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने मराठेशाहीचा इतिहासकार हरपल्याच्या भावना व्यक्त केल्या जात आहेत. डॉ.जयसिंगराव पवार यांचा जन्म ३० डिसेंबर १९४१ रोजी सांगली जिल्ह्यातील तडसरला झाला. डॉ.जयसिंगराव पवारांनी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातून एमए आणि पीएचडी पदवी संपादन केली.

तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी महाविद्यालयात अध्यापन केलं. विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणुन त्यांची ख्याती होती. एमएपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांची २० क्रमिक पुस्तकं अभ्यासक्रमात होती. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु आणि इतिहास संशोधक डॉ.अप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.जयसिंगरावांनी १९६४ मध्ये संशोधन कारकिर्दीला सुरुवात केली.

जयसिंगराव पवार यांनी महाराणी ताराबाई, सेनापती संताजी घोरपडे, मराठेशाहीचा मागोवा, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ यासारखे २५ हून अधिक इतिहासविषयक ग्रंथ लिहिले.

जनता इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थीनीचे

# नवोदय परीक्षेत उल्लेखनीय यश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट –** शेंदुरजनाघाट – जनता इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नवोदय प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेसाठी शाळेतील एकूण ४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामधून ओवी दिनेश शिंगरवाडे हिने ९० टक्के गुण मिळवत उज्ज्वल यश प्राप्त केले आहे. ओवीच्या या यशामुळे शाळेचा गौरव वाढला असून तिच्यावर जनता शिक्षण संस्थेचे संचालक मंडळ तसेच शाळेचे शिक्षक शिक्षिका व पालकांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे. तिच्या मेहनतीमुळे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाले असल्याचे शिक्षकांनी सांगितले.

मुख्याध्यापका जयश्री आंडे यांनी ओवीचे अभिनंदन करुन तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# झिरवाळांचं मंत्रिपद घालवण्यासाठी माजी मंत्र्याचा सहभाग

वडेट्टीवारांचा गंभीर आरोप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नागपूर –** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्याशी संबंधित प्रकरण चर्चेत असतानाच राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याशी संबंधित कथित व्हायरल व्हिडिओमुळे राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे.

यावरुन आता काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार यांनी गंभीर आरोप करत सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे. या संपूर्ण प्रकरणामागे राजकीय स्पर्धा आणि पदासाठी सुरु असलेली अंतर्गत चढाओढ कारणीभूत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. नागपूर येथे पत्रकारांशी बोलतांना विजय वडेट्टीवार म्हणाले की, 'सध्या जे नको आहेत त्यांनाच टार्गेट केले जात आहे. प्रत्येकजण दुसऱ्याची जागा मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहे. एका मंत्र्याची विकेट गेली की दुसरा तयारच असतो, आणि त्यालाही बाहेर काढण्यासाठी तिसरा रांगेत उभा असतो. त्यामुळेच अशा प्रकारची प्रकरणे घडत आहेत. 'पुढे बोलतांना वडेट्टीवार म्हणाले की, 'संबंधित प्रकार शासकीय वसतीगृहात घडल्याची माहिती समोर येत आहे. जर शासकीय वस्तीगृहाचा अशा प्रकारे गैरवापर झाला असेल, तर ते अत्यंत गंभीर आहे. अशा पदावर राहून अशा प्रकारचे वर्तन अजिबात योग्य नाही, या पार्श्वभूमीवर झिरवळ यांची विकेट काढतात की त्यांना पुन्हा टीममध्ये ठेवतात याचे उत्तर मुख्यमंत्री देऊ शकतील, 'असे वडेट्टीवार म्हणाले.

# संपादकीय

**'प्रभू रामाचा आदर्श मनी ठेवूया, आणि जीवनात सत्याच्या मार्गावर चालूया. रामनवमीच्या शुभेच्छा!'**

## साताऱ्याचा 'प्रयोग' हाणून पाडणे अपरिहार्यता!

साताारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष-उपाध्यक्षांच्या निवडणुकीमुळे राज्यातले राजकारण महायुतीच्या मर्यादेत ढवळून निघाले आहे. यात विरोधकांना फारसे स्थान नाही. कारण त्यांनी या विषयाचा राजकीय लाभ उठविण्यापेक्षा जिल्हा पोलीस प्रमुखांच्या (एसपी) निलंबनाचे अधिकार विधान परिषदेच्या उपसभापतींना असू शकतात का, यावर चर्चा केंद्रीत केली आहे.

साताराचे एसपी तुषार दोशी यांची निवडणूक काळातील भूमिका वादाचा विषय झाला आहे. त्यांचे निलंबन सभागृहात घोषित झाले असले तरी ते प्रत्यक्षात येणे शक्य नव्हते. कारण ते व्हावे म्हणून प्रयत्न करणाऱ्यांपेक्षा ते असे होऊ शकत नाही हे सांगणारे जास्त प्रभावशाली आहेत. यावरुन विधिमंडळाच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या अधिकारांची मर्यादा काय हेही धानात आणून दिले गेले. हे फारच महत्त्वाचे आहे. कारण यामुळे सभागृहाचे अधिकार सरकारपुढे कितपत प्रभावी याची चिकित्सा होत राहणार. विधिमंडळाच्या अधिकारांचे काय याची चर्चा नेते करतील. पण जनतेच्या दृष्टीने सत्ताधारी, विरोधक आणि नोकरशाही यात आपण कुठे बसतो यावरचे चिंतन महत्त्वाचे आहे. सातारच्या घटनेने पोलिसांची भूमिका नेमकी काय असते हेही समोर आणले आहे. लोकांचा दैनंदिन संबंध महसूल आणि पोलीस यंत्रणेशी येत असतो. नागरिक म्हणून आपले काही हक्क आहेत की, नाही याची चिंता सर्वांना असते. ज्यांना उत्तर सापडत नाही अशांची संख्या जास्त आहे अन ते स्थानिक प्रभावशाली नेत्याकडे जाऊन मदतीची अपेक्षा व्यक्त करतात. पण आपल्याकडे आलेल्या व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण करणे हे आपले मुलभूत कर्तव्य आहे आणि नियमाला धरुन असलेली गोष्ट स्वयंप्रेरणेने केली पाहिजे, असे वाटणाऱ्यांची संख्या नोकरशाहीत झपाट्याने कमी होत आहे. पोलीस दलात तर अशी जाणीव असणाऱ्यांची संख्या फारच अल्प आहे. पोलीस आणि राजकीय पक्ष किंवा सत्ताधारी यांचे संबंध काय यावर पानेच्या पाने लिहिता येऊ शकतात. पण सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व्ही.बालचंद्रन यांनी दिलेले एक उदाहरण सद्यस्थितीत पुरेसे आहे. कै.वसंतराव नाईक राज्याच्या मुख्यमंत्रीपदी असताना त्यांनी मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त एम.जी.मुगवे यांना एक विनंती (आदेश नव्हे) केली होती. दादरच्या एका वरिष्ठ पोलीस निरीक्षकाची बदली करण्यात यावी. कारण तिथले स्थानिक आमदार त्यांच्याबद्दल तक्रार करत आहेत, असे कै.नाईक आयुक्तांना म्हणाले. मुगवे यांनी त्या तक्रारीची माहिती घेऊन मुख्यमंत्र्यांना सांगितले की त्यात तथ्य नाही. पण नाईक म्हणाले की संबंधित अधिकाऱ्याची बदली करावी असा माझ्यावर दबाव येतोय. तरीही मुगवे बधले नाहीत. शेवटी नाईक यांनी या विषयाचा नाद सोडला. हा किस्सा महत्त्वाच्या पदांवर काम करुन निवृत्त झालेला एक पोलीस अधिकारी सांगतोय म्हणजे ती परिकथा नाही. बालचंद्रन पुढे म्हणतात की म्हणूनच की काय त्यावेळी पोलीस बिनतारी यंत्रणेवरुन संदेश देताना मुंबई पोलीस आयुक्तांचा उल्लेख 'किंग' असा केला जाई. आज पोलीस दलात काय चालले आहे, पोलीस नेमके कोणती भूमिका बजावत आहेत हे साताऱ्याच्या घटनेबाबत मंत्र्यांनीच विधिमंडळात सांगितल्याने या विषयावर सामान्यांनी फार बोलण्याची गरजच राहिलेली नाही. याची झळ ज्या राजकीय पक्षाच्या नेत्यांना बसली त्यांनी आजच्या राजकारणाचा आणि त्याला पुरक भूमिका बजावणाऱ्या नोकरशाहीचा विचार करावा. सर्वसामान्यांच्या हातात काहीही शिल्लक राहिलेले नाही. सद्यस्थितीत जो कोणी अस्वस्थ होत असेल त्यानेही स्वतःलाच विचारावे की, मी खरेच स्वंतत्र बुद्धीने महाराष्ट्राच्या उज्वल परंपरेला साजेसे वर्तन करुन माझे कर्तव्य पार पाडतोय का? उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या शिवसेनेने मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली इथे जे कमावले ते सातारा या त्यांच्या जन्मभूमीत गमावले. साताऱ्यातला त्यांचा प्रयोग यशस्वी होणार नाही याची संपुर्ण तजवीज झाली होती. तो यशस्वी होणे त्यांच्या वरीष्ठ सहयोगी पक्षाला परवडणारे नव्हते. कारण सातारा, सांगली आणि कोल्हापूर या महत्त्वाच्या जिल्ह्यांतील राजकारण भाजपाला एकहाती ताब्यात ठेवायचे आहे.

सांगली जिल्हा परिषद निवडणुकीत ते जमले नाही. सातारा महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वाचा जिल्हा. तो सर्वंकष ताब्यात ठेवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांना अंकित ठेवणे किंवा निष्प्रभावित करणे हे दोनच मार्ग उरतात. साताऱ्यात शिंदेची सेना आणि पवारांची राष्ट्रवादी ही युती यशस्वी होणे परवडणारे नव्हते. त्याचा वेगळा संदेश राज्यात गेला असता आणि भविष्यात ही युती पुढे सरकली असती.

# परमात्म्याचा तेजस्वी अवतार प्रभू श्रीराम



चैत्र शुद्ध नवमीला अयोध्येत राजा दशरथ व माता कौशल्या यांच्या पोटी भगवान विष्णूचा सातवा अवतार, प्रभू श्रीरामांचा जन्म झाला. जो रामनवमी म्हणुन साजरा केला जातो. हा सण मर्यादा पुरुषोत्तम रामाच्या नीतिमत्ता, त्याग आणि आदर्श राज्यकारभाराचे स्मरण करतो. या दिवशी पूजा, भजन आणि रामायण पठण करुन उत्सव साजरा केला जातो. श्रीराम हे एकवचणी, एकबानी आणि आदर्श राजा होते, ज्यांनी माता सीतेचा त्याग केल्यानंतरही त्यांचा आदर्श जपला. रामनवमीला चैत्र नवरात्रीची सांगता होते आणि दुपारच्या वेळी पाळणा सजवुन जन्मोत्सव साजरा केला जातो.

देशभरातील राम मंदिरात विशेष पुजा, रामकथा आणि पालखी सोहळे आयोजित केले जातात. श्रीराम ही मानवी जीवनातील सर्वोच्च आदर्श (पुरुषोत्तम) मानले जातात. त्यांचे आयुष्य पितृभक्ती, बंधुप्रेम आणि धर्मपालनांचा वस्तू पाठ आहे. सनातन धर्मात रामनवमीला अत्यंत पवित्र सण मानला जातो या दिवशी सर्व जण एकमेकांना शुभेच्छा देतात. रामनवमीच्या या पवित्र दिवशी तुमचे जीवन आनंदाने फुलावे तुमच्या हातून सत्कर्म घडावे या दिवशी उत्सवात अनेक हिंदू लोक सहभागी होऊन श्रीराम शास्त्रोत्र पठण, अखंड रामनामजप विद्युत रोशनाई राम मंदिरातून चैत्र शुक्ल प्रतिपदेपासून नऊ दिवस हा उत्सव चालतो. रामायणाचे पारायण, कथाकीर्तन आणि राम मूर्तीला विविध शृंगार अशा प्रकारे उत्सव साजरा केला जातो. रामायणातील सर्वात मोठा धडा म्हणजे प्रत्येक मनुष्याच्या जीवनात धार्मिकतेचे सर्वोच्च महत्त्व आहे. धार्मिकता ही जीवनाला प्रज्वलित करणारी अध्यात्मिक ठिणगी आहे. धार्मिकतेचा विकास ही माणसातील सुप्त देवत्व जागृत करण्याची प्रक्रिया आहे. परमात्म्याचा तेजस्वी अवतार प्रभू श्रीराम यांनी आपल्या जीवनातून नीतिमत्तेच्या मार्गावर कसे चालायचे हे दाखवून दिले आहे. भगवान कृष्णाने भगवद्गीतेमध्ये स्पष्टपणे सांगितल्याप्रमाणे आपल्याला हिंदू धर्मात प्रश्न विचारण्यात प्रोत्साहित केले जाते.आम्हाला देवासह सर्व तत्त्वज्ञानावर आमची स्वतःची मते तयार करण्यासही प्रोत्साहित केले जाते.तथापि निर्णय घेण्यापूर्वी, आम्हाला सखोल विचार करण्यास आणि विषयाच्या सर्व पैलूंचे परीक्षण करायला देखील चालना मिळते. परंतु जेव्हा प्रभू श्रीराम आणि इतर हिंदू देवतांचा विचार करतो तेव्हा आपण आपल्या प्रयत्ना अपयशी ठरतो. धर्म प्रेम आणि सत्य आधारित आपले जीवन परिपूर्ण होण्यासाठी आपण सर्व प्रभू श्रीरामाची प्रार्थना करतो. प्रत्येक प्रकारच्या नात्यासाठी परिपुर्ण आदर्श प्रभू श्रीरामाच्या जीवनात आवडतो. श्रीराम हे महान सामर्थ्य वैभव मानवी संबंधावर प्रभुत्व आणि संसारिक शक्तींनी संपन्न एक पराक्रमी राजा होते. कोणताही स्वार्थ न ठेवता त्यांनी प्रेमाने सत्यतेने आणि नीतिमत्तेने आपल्या क्षमतांचा उपयोग सर्वसृष्टीच्या हितासाठी केला. स्वामी विवेकानंद म्हणाले होते, भगवान श्रीराम हे भारतीयत्वाचे प्राचीन प्रतीक आणि भारतीय संस्कृतीचे मूर्त स्वरुप आहेत.ते आदर्श राजा, पुत्र, भाऊ, पती आणि मित्र आहे. शतकांनुशतके आम्ही त्यांना सर्वोत्कृष्टसर्वांचे मूर्त रुप मानतो. तसे बनण्याची माणसाची इच्छा असू शकते. 'भगवान श्रीराम हे हजारो वर्षापासून भारतीय मूल्यव्यवस्थेशी जोडलेले आहेत.काही इतिहासकारांनी त्यांचा इंग्रजीत अनुवाद करतांना, जाणूनबुजून खावशरश्र चरप 'आदर्श पुरुष' असा अर्थ केला आहे. जगातील आठ अब्ज लोकांसाठी 'अंतर्गत व्यवस्थापन हे सर्वात कठीण आव्हान. प्रत्येकजण, मग तोअब्जधीश असो किंवा झोपडपट्टीत राहणारा, हे अशक्य काम पूर्ण करण्यासाठी आपल्या जीवनात संघर्ष करत असतो. प्रभू श्रीराम यांचे जीवन मानवी दृष्टिकोनातून कठीण असतानाही त्यांनी जगाला दाखवून दिले की, आंतरिक व्यवस्थापन कसे असावे. प्रभू श्रीराम या अडचणींना तोंड देत होते.त्यापैकी दहा टक्के अडचणी आल्या तरीही आपण जीवन योग्य रीतीने जगू शकणार नाही. वेदावतार श्रीमद्वामिल्की रामायणाचा शब्दातश्रीराम म्हणजे सूर्य, अग्नीचा अग्नी, देवांचा स्वामी, परम अपरिवर्तित सार, निरपेक्ष, सर्वज्ञ, सर्वव्यापी, निराकार, परम स्वातंत्र्य, सर्वावर राज्य करणारा एक शासक, प्रभो-प्रभू शाश्वत, महा-विष्णु, सर्वोच्च परात्पर आत्मा, म्हणुन सर्व काही श्रीरामात व्याप्त आहे. ते परम दैवत आहेत. राम या शब्दाचा अर्थ देव आहे. विष्णूचा सातवा अवतार श्रीरामाच्या जन्माप्रित्यर्थ रामनवमी साजरी करतात.

या दिवशी पुष्य नक्षत्रावर, माध्यन्ही, कर्क लग्नी सुर्यादी पाच ग्रह असताना अयोध्येत श्रीराम जन्मले. देवता अन अवतार यांच्या जन्मतिथीला त्यांचे तत्त्व भूतलावर जास्त प्रमाणात कार्यरत असते. या दिवशी श्रीरामतत्व नेहमीपेक्षा हजार पटिने कार्यरत असते. काही विद्वानांच्या किंवा शास्त्रीय पुस्तका नुसार भगवान श्रीराम यांनी अकरा हजार वर्षे राज्य केले. प्रभू श्रीराम वयाच्या २५ व्या वर्षी वनवासाला गेले तेव्हा ती जेव्हा परतले ते ३९ वर्षाची होते. तेव्हा ते अयोध्येला परतले त्यांचा राज्यभिषेक झाला. त्यांच्या राज्याभिषेकानंतर तीस वर्षे सहा महिने राज्य केल्यानंतर, त्यांनी वयाच्या ७० व्या वर्षी त्याग केला. दशा वर्ष सहस्त्रानी दशा वर्षा शतानी च!रामो राज्य उपासित्वा ब्रह्म लोक प्रयासयती!! १० हजार वर्षे आणखी आणि एक हजार वर्ष (म्हणजे एकुण अकरा वर्ष) त्यांच्या राज्याची सेवा केल्यानंतर, प्रभू श्रीराम यांनी ब्रह्मदेवाच्या निवासस्थानाकडे प्रवास सुरु केला. दुसरीकडे भगवान श्रीराम हे फक्त सात हजार शंभर वर्षांपूर्वी पाच हजार शंभर इसवीसन पूर्वमध्ये अस्तित्वात होते असे म्हटले जाते. आपण दोघांचा समतोल कसा साधायचा हे उत्तर दुसरे महाकाव्य महाभारतातून येते. अहोरात्र महाराज तुल्य संवत्सरेण ही महाभारत, महाराजांसाठी, धर्माचे पालन करणाऱ्या व्यक्तीसाठी एक दिवस एक वर्षाच्या बरोबरीचा असतो ३६० दिवसाचे एक वर्ष आणि ३० व दिवसाचे बारा महिने वापरुन, काव्यात्मक स्वरुपात ११००० वर्षांची वास्तविक संख्या तीस वर्ष आणि सहा महिने इतकी आहे, एवढी वर्ष भगवान श्रीराम यांनी अयोध्येवर राज्य केले, ते योग्य आहे. प्रभू श्रीराम आणि त्यांची वानरसेना समुद्र पार करुन लंकेत पोहोचली नसती, तर रामायणाची लढाई कधीच झाली नसती. सागरावर पूल बांधल्याशिवाय पोहोचणे अशक्य होते. असे अख्यायिका आहे की वॉनरांच्या सैन्याने ओलांडण्यासाठी पूल बांधला. हजारो वर्षानंतर 'नासा'ने घेतलेल्या अंतराळ प्रतिमा मधून भारत आणि श्रीलंका यांच्यातील पाल्क सामुद्रधुनी ओलांडून एक रहस्यमय प्राचीन पूल दिसून येतो. रामायणा सांगितले आहे की, यंत्रे किंवा यांत्रिक उपकरणे वानरसेना झाडे तोडण्यासाठी वापरत असत नंतर मोठे दगड आणि शेवटी छोटे दगड पूल बांधण्यासाठी वापरत असत. हा पूल बांधण्यासाठी वास्तूविशारद नील आणि नल यांच्यादेखरेखी खाली पाच दिवस आणि दहा लाख वानरांनी मिळून पूल तयार केला. पुलाची परिणामे, जेव्हा तो पुल बांधला गेला तेव्हा त्यांची लांबी १०० योजन (योजन अंतराचे वैदिक माप आहे) आणि दहा योजन रुंदीची होती. ज्यामुळे त्याचे गुणोत्तर १०: १ होती. भारतातील धनुषकोडी ते श्रीलंकेतील तलाई मन्नारपर्यंतचा पूल, सध्या मोजल्याप्रमाणे अंदाजे ३५ किमी लांबी आणि ३.५ किमी रुंदी आहे. १०:१ च्या प्रमाणात आहे. रामेश्वरमच्या किनारी भागात अजूनही काही तरंगणारे दगड सापडतात. विज्ञान या घटनेने शास्त्रीय विश्लेषण करूशकले नाही. समुद्रशास्त्रीय अभ्यासानुसार रामसेतू ७००० वर्षे जुना आहे आणि धनुषकोडी जवळील समुद्रकिनाऱ्याची कार्बन डेटिंग रामायणाच्या तारखेची जुडते. भगवान श्रीकृष्ण श्रीराम हे संपुर्ण भारतीय उपखंड आणि आग्नेय आशीय तसेच संपूर्ण पाश्चात्यसभ्यतेमध्ये एक आदरणीय आणि प्रेरणादायी दैवत आहेत,जिथे हिंदू महाकाव्ये आणि मूल्ये ओळख आणि लोकप्रियता मिळवत आहेत.

भगवान श्रीरामाचे जैन धर्मात उच्च स्थान आहे. जीवनात धार्मिकतेचे सर्वोच्च महत्त्व आहे धार्मिकता ही जीवनाला प्रज्वलित करणारे अध्यात्मिक ठिणगी आहे. धार्मिकतेचा विकास ही माणसातील सुप्त देवत्व जागृत करण्याची प्रक्रिया आहे परमात्म्याचा तेजस्वी अवतार प्रभू श्रीराम यांनी आपल्या जीवनातून नितीनमतेच्या मार्गावर कसे चालवायचे हे दाखवून दिले आहे. मानवजातीने त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आदर्श नुसार जगू या, तरच या जगात शाश्वत शांती, समृद्धी आणि कल्याण होऊ शकेल. जय श्रीराम..!




शेषराव नर्मदा गोपाळ कडु
वरुड
मो.नं.९९२३९८८७३४


# व्यक्तीवेध : निस्सीम अवधूत भक्त 'कृष्णराव राजगुरे'

अमरावती जिल्ह्यातील अवधूत पंथीयांचे एक निस्सीम भक्त कृष्णराव राजगुरे यांनी आयुष्यभर या संप्रदायाच्या प्रचार,प्रसार आणि विकासासाठी कार्य केले. नुकतेच त्यांचे दिर्घ आजाराने वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले. रामनवमी हा त्यांचा जन्मदिन. या निमित्ताने त्यांचे व्यक्तीमत्व व कार्याचा घेतलेला हा धांदोडा.

अमरावती जिल्ह्यातील सावंगा विठोबा ही अवधूत पंथीयांची काशी. या पंथाचे सच्चे पायीक आणि अवधूत नामाचे गाढे अभ्यासक म्हणून श्रीकृष्ण राजगुरे सर्व परिचीत आहेत. व्यक्ती म्हणुन जगण्यापेक्षा एक व्यक्तिमत्व म्हणुन जगा कारण व्यक्तीचा अंत होतो पण व्यक्तिमत्व हे सदैव जीवंत राहते, असेच उत्तम व्यक्तिमत्त्वाचे धनी श्रीकृष्ण राजगुरे. अमरावती येथील मुदलीयार नगरातील अवधूत भजन मंडळ व राजगुरे टेलर्स या टेलरिंग फर्मचे ते संचालक होते. अवधूतवासी (वैकुंठवासी) कृष्णराव पार्वती सखारामसा राजगुरे यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील शिराळा या छोट्याशा गावात २५ मार्च १९३९ रोजी रामनवमीच्या मंगलमय पर्वावर एका सामान्य कुटुंबात झाला.

कृष्ण यांना बालपणापासून वडील सखारामसा यांचा अध्यात्मिक सहवास लाभला. वडिलांनी 'रामायण', 'महाभारत' या महाकाव्यातील नैतिक ज्ञानाचे धडे त्यांना दिले. हसत, खेळत व शिकत बालसुलभ मन संस्कारी आकार घेत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. हा त्यांच्यावर पहिला दुःखाचा आघात झाला. वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षी वडिलांचे छत्र हरवल्याने आई-पार्वतीची साथ देणारे कृष्णा शालेय अभ्यासात हुशार असून सुद्धा परिस्थिती अभावी शिक्षण घेऊ शकले नाही. लौकीक अर्थाने ६ वी



पर्यंत शिक्षण पुर्ण करुन मिळेल ती छोटी-मोठी कामे करुन आईची साथ देत अचलपूर या तालुक्याच्या गावी त्यांनी टेलरिंग कामाचा गुण संपादित केला. वयाच्या १४ व्या वर्षी अमरावतीकडे कुच करुन गाठी असलेल्या टेलरींग कामाच्या कौशल्यातून त्यांनी शहरातील मुदलीयार नगरातील गुप्ता मार्केट सेंट्रल लॉज येथे फुट पायरी सदृश्य जागेवर एक शिलाई मशीन घेऊन व्यवसाय सुरु केला. पुढे १९६३ मध्ये याच मार्केटमध्ये राजगुरे टेलर्स नावाने एक टेलरिंग फर्म सुरु केली. एकीकडे पोटापाण्याची खडगी भरत असताना वयाच्या २५ व्या वर्षी त्यांचा अध्यात्मिक प्रवासाचाकडे कल वाढू लागला आणि तेव्हापासून पांढरे शुभ्र शर्ट, पैजामा व काळी टोपी असा पोशाख धारण करून ते अवधूत संप्रदायाचे पायीक झाले.

त्यांनी हरिनामा शिवाय कोणतेही व्यसन केले नाही त्यांनी संसारिक जीवन जगताना अवधुत संप्रदायातील अध्यात्मिक कास धरली ती शेवटच्या श्वासापर्यंत. त्यांच्या कौटुंबिक सामाजिक आणि वैयक्तिक जीवनात बरेच खडतर प्रसंग आलेत. त्याला संयमाने सामोरे जाऊन स्वतःपेक्षा इतरांच्या वैयक्तिक जीवनात आनंद फुलवण्याचे कार्य त्यांनी कायमच केले. स्वार्थ त्यागून परमार्थाची कास व यातच त्यांनी आनंद मानला व अहर्निश अवधूत भक्ती केली.

**अशा आनंद मूर्तीची वेळो वेळा**

**खरे स्मरण!**

**अगाध गुण देईल त्याला हो त्याला**

**दिवस आला हो आला !**

या अवधूतपंथातील ओवीतील चरणांप्रमाणे त्यांनी भक्ती केली. या आनंद मुर्तीची प्राणज्योत बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी मावळली आज तिथीप्रमाणे रामनवमी २६ मार्च २०२६ रोजी त्यांचा ८८ वा जन्मदिवस. अशी ही आनंदमूर्ती त्यांच्या हरिनामरुपी ध्यासाने व विचाराने सदैव आपल्या अवतीभोवती चैतन्य स्वरूपात राहील अशी मनाला आस आहे.

**'पारु मायेच्या पुता! सखारामाच्या सुता! कृष्णराव अवधूता! तुम्ही भक्तीचा सागर आम्ही आहो बिंदू रुप..!**

**' कृष्ण महाराज धनी अवधूत.**


श्यामकुमार शिरभाते
रा.अमरावती


वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# भोंदू बाबा अशोक खरातप्रकरणी रुपाली चाकणकर पुन्हा अडचणीत

## नव्या धाग्यामुळे आता प्रकरणाला गंभीर राजकीय वळण

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नाशिक** – नाशिकमधील स्वयंघोषित आध्यात्मिक भोंदूबाबा अशोक खरात याला अटक करण्यात आली असून सध्या तो पोलीस कोठडीत आहे. या प्रकरणी सध्या नवनवीन खुलासे होतांना दिसत आहेत. आता अशोक खरातप्रकरणी एका जुन्या कागदपत्राने राज्याच्या राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. २०१७ मधील अशोक खरातच्या वडिलांच्या निधनानंतरची दशक्रिया पत्रिका सध्या समोर आली आहे. त्यावर चक्क राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे नाव शोकाकुल म्हणून छापण्यात आल्याचे समोर आले आहे. या नव्या धाग्यामुळे प्रकरणाला आता गंभीर राजकीय वळण मिळाले आहे. अशोक खरात हा सिन्नर तालुक्यातील मीरगाव येथील श्री ईशान्येश्वर मंदिर आणि शिवानिका संस्थानाचा संस्थापक म्हणून ओळखला जातो. स्वतःला कॅप्टन म्हणवून घेणाऱ्या अशोक खरातवर फसवणुक आणि भोंदूगिरीचे गंभीर आरोप झाले आहेत.



त्यामुळे तो वादाच्या भोऱ्यात सापडला आहे. मात्र, आता त्याच्या वडिलांच्या निधनानंतर होणाऱ्या दशक्रिया विधीची पत्रिका समोर आली आहे. ही पत्रिका नोव्हेंबर २०१७ मधील आहे. अशोक खरातचे वडील कै. एकनाथ त्र्यंबक खरात यांच्या निधनानिमित्त ही पत्रिका छापण्यात आली होती. ही पत्रिका सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामुळे नाशिकसह संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. रुपाली चाकणकर या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या मोठ्या नेत्या आहेत. त्यांचे नाव या पत्रिकेवर शोकाकुल म्हणुन असणे याचा अर्थ खरात कुटुंबियांशी त्यांचे अत्यंत निकटचे किंवा कौटुंबिक संबंध असावेत, असा अंदाज वर्तवला जात आहे. २०१७ मध्ये अशोक खरात आणि रुपाली चाकणकर यांच्यात नेमके काय संबंध होते? भोंदूगिरीचे साम्राज्य उभे करताना खरातला राजकीय राजाश्रय मिळत होता का?एका गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तीच्या घरगुती पत्रिकेवर राजकीय नेत्याचे नाव येणे हा केवळ योगायोग आहे की जाणीवपूर्वक दिलेला पाठिंबा? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

## भरधाव वाहनाने बाईकला धडक दिल्याने

# भीषण अपघातात पती-पत्नीचा जागीच करुण अंत

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**जळगाव** – जळगाव जिल्ह्यामध्ये दररोज अपघाताच्या घटनांमध्ये वाढ होत असून अनेकांचा यात बळी जात आहे. असाच एक भीषण अपघात काल बुधवारी झाला. चुलत भावाच्या मुलीचं लग्न आटोपून येत असताना दाम्पत्याच्या दुचाकीला एका अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्यानं त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत पोलीस ठाण्यात अद्यापपर्यंत कुठलाही नोंद करण्यात आलेली नव्हती. जळगाव तालुक्यातील उमाळा-गाडेगावजवळ झालेल्या भीषण अपघात पिंप्राळा हुडको येथील दाम्पत्य यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना काल बुधवारी रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास



घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गर्दी केल्याचं दिसून आलं. मुझफ्फर अली सय्यद बबन (वय ६०) आणि ताहेराबी मुजफ्फर अली (वय ५५) दोन्ही रा.पिंप्राळा हुडको, जळगाव असं मयत झालेल्या दाम्पत्याचं नाव आहे.

जळगाव शहरातील पिंप्राळा हुडको परिसरामध्ये मुझफ्फर अली सय्यद बबन हे आपली पत्नी ताहेराबी आणि दोन मुलांसह वास्तव्याला होते. मसाला विक्री करुन ते आपला कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. काल बुधवारी रोजी त्यांच्या चुलत भावाच्या मुलीचं लग्न असल्याकारणामुळे ते आपल्या पत्नी ताहेराबी यांच्यासोबत दुचाकी क्रमांक एमएच १९ इजे ३८९८ जळगाव येथून फर्दापूर येथे गेले होते.

दरम्यान, लग्न आटपून सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास जळगाव तालुक्यातील उमाळे ते गाडेगाव दरम्यानच्या पुलाजवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीसह दोघेजण खाली पडले. या भीषण अपघातात मुझफ्फर अली सय्यद बबन आणि ताहेराबी मुजफ्फर अली हे गंभीरीत्या जखमी झाल्याने त्यांना खासगी वाहनातून जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केलं.

यावेळी वैद्यकीय अधिकारी यांनी तपासणी केली असता दोघांना मयत घोषित केलं. सदर घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयामध्ये एकच गर्दी करुन मोठा आक्रोश केला. याबाबत पोलीस ठाण्यात अद्यापपर्यंत कुठलीही नोंद करण्यात आलेली नव्हती. त्यांच्या पश्चात दोन मुलं, सुना, एक विवाहित मुलगी असा परिवार आहे.

# पण आदित्य ठाकरेंनी महाराष्ट्रात फिरलं पाहिजे

## मुंबईत खासदारांच्या बैठकीत खासदारांची थेट तक्रार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खासदारांची मुंबईत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत अंतर्गत धुसफूस आणि नाराजीच समोर आल्याची चर्चा आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासमोर प्रियंका चतुर्वेदी यांची संजय राऊतांविरोधात नाराजी आणि युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांची कमालीची शांतता चर्चेचा विषय ठरत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बैठकीपूर्वी संजय राऊत यांच्या निवासस्थानी झालेल्या चर्चेत काही खासदारांनी आदित्य ठाकरे



यांच्या कार्यपद्धतीवर थेट बोट ठेवले. 'उद्धव ठाकरे यांना प्रकृतीच्या काही मर्यादा आहेत, हे आम्हाला मान्य आहे. मात्र, आदित्य ठाकरे यांनी राज्यभर फिरायला हवे, ते पुरेसा वेळ देत नाहीत,' अशी तक्रार खासदारांनी केली होती. या तक्रारीचा पडसाद खासदारांच्या मुख्य बैठकीतही उमटले. बैठकीत राज्यसभेच्या जागेवरुन आणि संजय राऊत यांनी शरद पवारांबद्दल केलेल्या विधानावरुन प्रियंका चतुर्वेदी प्रचंड आक्रमक झाल्या.

संजय राऊत यांनी शरद पवारांचे नाव का घेतले?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावर उद्धव ठाकरेंनी राऊतांची बाजू सावरली. दुसरीकडे, बैठकीत उपस्थित असूनही आदित्य ठाकरे यांनी एकाही खासदाराशी संवाद साधला नाही. त्यांच्या देहबोलीतून ते नाराज असल्याचे स्पष्टपणे जाणवत होते, असे बैठकीतील सूत्रांचे म्हणणे आहे. आदित्य ठाकरेंनी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर जावे, अशी मागणी खासदारांनी केल्याने त्यांच्या सक्रियतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. बैठकीनंतरही आदित्य ठाकरे कोणाशीही न बोलता निघून गेल्याने खासदारांमध्ये उलटसुलट चर्चा सुरु झाली आहे.

# पुण्यात ५०० चौरस फुटांच्या घरांना मालमत्ता करात माफी

## पीएमसीच्या एका अटीमुळे सामान्यजनांचं टेन्शन वाढलं

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**पुणे** – २०२६ मध्ये पार पडलेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत नेत्यांनी दिलेल्या आश्वासनांनुसार नागरी प्रशासनाकडून कर सवलत मिळण्याची आशा बाळगून असलेल्या लहान मालमत्तेच्या मालकांना मात्र आणखीच वाट पहावी लागणार आहे.

अलीकडेच पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीने अर्थसंकल्प जाहीर करताना ५०० चौरस फुटांपर्यंतच्या मालमत्तांसाठी कोणत्याही प्रकारची सरसकट करमाफी जाहीर केली नाही, जी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या




(बीएमसी) धोरणामध्ये लागू केलेली. याउलट महिलांच्या मालकी हक्काला प्रोत्साहन पुणे शहरात महानगपालिकेकडून ३१ मार्च २०२६ पर्यंत महिलांच्या नावावरील ५०० चौरस फुटांपर्यंतच्या मिळकतींना ५० टक्के मिळकत करमाफी जाहीर केली आहे. अशाप्रकारे, महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदणी करण्याचा चलन वाढू शकेल. भारतीय जनता पक्षाने अलीकडेच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात अशा प्रकारच्या करमाफीचे आश्वासन दिले होते.

मात्र, आता पुणे महानगरपालिकेने केवळ लहान मालमत्ता आणि विशेषतः ज्या मालमत्तांची मालकी महिलांकडे आहे, केवळ त्यांच्यासाठीच ५० टक्के करसवलत जाहीर केली आहे.

# पक्षाची बदनामी रोखण्यासाठी चाकणकरांचा राजीनामा घ्या

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आमदार, नेत्यांची मागणी



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातचं प्रकरण सध्या देशासह राज्यभरत चांगलचं गाजत आहे. नाशिकमधील विकृत भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरुन सध्या राजकीय वतुर्ळात अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

अशोक खरात हा राज्यातील अनेक बड्या राजकीय नेत्यांचा अध्यात्मिक मार्गदर्शक होता. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांना अशोक खरात याच्याशी जवळचे संबंध असल्यामुळे राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतर आता रुपाली चाकणकर यांना आणखी एक झटका बसण्याची शक्यता आहे. रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला असला तरी त्यांच्याकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे महिला प्रदेशाध्यक्षपद आहे. मात्र, आता या पदावरुनही रुपाली चाकणकर यांची उचलबांगडी होण्याची दाट शक्यता आहे. अशातच एक महत्वाची माहिती समोर आली आहे. पक्षाच्या मंगळवारी पार पडलेल्या बैठकीत निम्म्याहून जास्त आमदारांसह नेत्यांकडून पक्षाची बदनामी रोखायची असेल तर चाकणकर यांचा राजीनामा घेणेच योग्य राहील, अशी अजित पवार गटाच्या आमदारांनी भूमिका घेतल्याची माहिती समोर आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मंगळवारी पार पडलेल्या बैठकीत निम्म्याहून जास्त आमदारांसह नेत्यांकडून पक्षाची बदनामी रोखायची असेल तर रुपाली चाकणकर यांचा राजीनामा घेणेच योग्य राहील अशी भूमिका व्यक्त केल्याची माहिती आहे. आमदारांनी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्यासमोर ही भूमिका मांडल्याचं समोर आलं आहे. रुपाली चाकणकर यांचा राष्ट्रवादी काँग्रेसचे महिला प्रदेशाध्यक्षपद पदाचा राजीनाम्याचा निर्णय आता राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्यात कोर्टात आहे. अशोक खरातचे महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर ते अनेक बड्या राजकीय नेत्यांसोबतचे फोटो आणि व्हिडिओ समोर आल्याने मोठ्या प्रमाणावर आरोप प्रत्यारोप झाले. याच आरोपांच्या पार्श्वभूमीवर रुपाली चाकणकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नावे पत्र लिहित राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यांनी हे पत्र राष्ट्रवादीच्या अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे दिले. या प्रकरणामुळे केवळ नाशिकच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली. त्याआधी रुपाली चाकणकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांची भेट घेऊन त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली होती. रुपाली चाकणकर यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या म्हटलं आहे की, 'मी रुपाली निलेश चाकणकर विनंतीपूर्वक कळवू इच्छिते की, १५ ऑक्टोबर २०२४ रोजी माझी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती. माझ्या वैयक्तिक कारणाने मी स्वेच्छेने सदर पदाचा राजीनामा या पत्राद्वारे सादर करत आहे.

# महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर शरद पवार यांना भेटला

## साहेबां'कडून लाखोंचा धनादेश, काका पवारांनाही मोठं गिफ्ट

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**पुणे** – कुस्ती शौकिनांचे शहर असलेल्या पुण्यातील वाघोली येथे नुकतेच संपन्न झालेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा विजेता, डबल महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीरने राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.

डबल महाराष्ट्र केसरी पैलवान राजकीय वस्तादाला भेटल्याची चर्चा यावेळी रंगली. हर्षवर्धनने शरद पवारांचे आशीर्वाद घेतल्यानंतर महाराष्ट्र केसरी विजयाची मानाची चांदीची गदा शरद पवार यांच्या हाती देत फोटो काढले. तर खासदार शरद पवार यांनी हर्षवर्धन सदगीरला १२ लाख रुपयांची शिष्यवृत्ती तर काका पवार यांच्या पुण्यातल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल या तालमीसाठी ५० लाख रुपयांच्या अर्थसहाय्याची घोषणा केली आहे. त्यापैकी २५ लाखांचा पहिला हप्ता काका पवार यांच्या सुपुर्द करण्यात आला.

हर्षवर्धन सदगीर आणि अर्जुन पुरस्कार विजेते प्रशिक्षक काका पवार यांनी शरद पवार यांची नुकतीच



मुंबईत भेट घेतली तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही काका पवार व हर्षवर्धन सदगीर यांनी भेट घेतली. त्यावेळी येत्या अधिवेशनात नाशिक महानगरपालिकेत नोकरी देण्याचे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी दिली असल्याचे काका पवार यांनी सांगितले आहे. दरम्यान, महाराष्ट्र हर्षवर्धनने दोनच महाराष्ट्र केसरीचा किताब जिंकल्यानंतर मनातील खंत बोलून दाखवली होती. मी नाशिक येथे मंत्री दादा भुसेंना भेटलो, एकनाथ शिंदेंनाही भेटलो होतो. पण, मला सरकारी नोकरी मिळाली नाही, आता मला नोकरीची गरज नाही असेही त्याने म्हटले होते.

हर्षवर्धन सदगीर यांचे कौतुक करीत ऑलिंपिकपटू होण्यासाठी पुढील २ वर्षासाठी महिना ५० हजार प्रमाणे १२ लाखांच्या शिष्यवृत्तीचा धनादेशही शरद पवार यांच्याकडून देण्यात आला. काका पवार यांच्या तालमीतील हर्षवर्धनसह ११ मल्लांनी पदकाची लयलूट केल्याबद्दल आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलाला ५० लाख रुपयांचं आर्थिक सहाय्य शरद पवार यांनी दिलं आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही कालच ट्विट करुन हर्षवर्धन सदगीरच्या भेटीची माहिती देत शुभेच्छा दिल्या होत्या. महाराष्ट्र केसरी २०२६ चे विजेते पैलवान हर्षवर्धन सदगीर यांनी माझी सदिच्छा भेट घेतली.

यावेळी मोठ्या जिद्दीने, मेहनतीने आणि उत्कृष्ट कामगिरीने महाराष्ट्र केसरी हा मानाचा किताब पटकावल्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन केले तसेच पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, असे ट्विट सुनेत्रा पवार यांनी केले होते.

## जे.जे.खेरडे प्राथ.व उच्च प्राथ. शाळेतील विद्यार्थ्यांची

# इंडियन टॅलेंट ऑलंपियाड स्पर्धा परीक्षेत राज्यस्तरावर भरारी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्थाद्वारा संचालित जे.जे.खेरडे प्राथ.व उच्च प्राथ. शाळेमध्ये इंडियन टॅलेंट अकॅडमी द्वारा आयोजित इंटरनॅशनल सायन्स, मॅथ्स, इंग्लिश, हिंदी, जीके आणि ड्रॉईंग ओलंपियाड या विषयनिहाय स्पर्धा परीक्षेमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही यशाची परंपरा राखत या स्पर्धा परीक्षेत एकूण ५ विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर यश संपादन करुन शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे.

यामध्ये इयत्ता १ लीचा विद्यार्थी हिमेश ठाकरे मॅथ्स ओलंपियाडमध्ये राज्यातून १९ वा मेरिट व एक्सलन्स मेडल अवॉर्डचा मानकरी, इयत्ता ३ री ची विद्यार्थिनी सर्वस्वी सत्यपाल काळबांडे इंटरनॅशनल मॅथ्स ओलंपियाड मध्ये राज्यातून वी १७ वी मेरिट व एक्सलन्स मेडल अवॉर्डची मानकरी, जान्हवी फुटाणे इयत्ता ४ थी ही विद्यार्थिनी इंटरनॅशनल मॅथ्स



ओलंपियाडमध्ये राज्यातून ४ थी मेरीट आली असून स्टेट टॉपर अवार्ड व एक हजार रुपये स्कॉलरशिपची मानकरी, रितिक मोहोड इयत्ता ५ वी इंटरनॅशनल मॅथ्स ओलंपियाडमध्ये राज्यातून २१ वा मेरिट व एक्सलन्स मेडल अवॉर्डचा मानकरी तर शर्मिष्ठा कडू इयत्ता ४ थी ही विद्यार्थिनी इंटरनॅशनल आर्ट ओलंपियाडमध्ये राज्यातून ६ वी मेरिट आली असून स्टेट टॉपर अवॉर्ड व सातशे रुपये स्कॉलरशिपची मानकरी ठरली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष संजय गणोरकर, उपाध्यक्ष पुरुष-ोत्तम कळमकर, सचिव जगदीश नेरकर, सहसचिव शामसुंदर खेरडे तथा सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापक भूपेंद्र पोहरकर, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## लक्ष्मी नारायण मंदिरात धाडसी चोरी

# २१ हजार ७०० रुपयांचा ऐवज लंपास

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथुन जवळच असलेल्या लोणी येथील लक्ष्मी नारायण मंदिरात अज्ञात चोरट्याने मंदिराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि गाभाऱ्यातील मौल्यवान पितळी व तांब्याच्या वस्तूंसह दानपेटीतील रोकड असा एकूण २१ हजार ७०० रुपयांचा मुदेमाल चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

या घटनेमुळे परिसरात खळबळ माजली असून देवाच्या दारीही आता



चोऱ्या वाढल्याने भाविकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार अज्ञात इसमाने मंदिराच्या दरवाजाचे कुलूप तोडून गाभाऱ्यात प्रवेश केला. चोरट्याने गाभाऱ्यातील मौल्सवान साहित्य असा सुमारे २१ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला. केवळ वस्तूच नव्हे तर चोरट्याने मंदिराच्या दानपेटीचेही कुलूप तोडून त्यातील अंदाजे ७०० रुपयांची रोकड चोरुन नेली. अशाप्रकारे एकूण २१,७०० रुपयांचा माल चोरीला गेला आहे.

या प्रकरणी तक्रार प्राप्त होताच बेनोडा (शहीद) पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुराव्यांच्या आधारे चोरट्याचा शोध सुरु आहे.

## कॉलेजमधुन निघतांना शिक्षिकेच्या बाईकला डंपरची धडक

# फरफटत नेल्याने जागीच मृत्यू, घटनेनं कॉलेजवर शोककळा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**सातारा** – कराड आणि मलकापूरमध्ये बुधवारी रात्री झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये एका प्राध्यापिकेसह भाजी विक्रेती महिला जागीच ठार झाली तर १३ वर्षांच्या मुलीसह तीन महिला गंभीर जखमी झाल्या. कॉलेज सुटल्यानंतर सायंकाळी कराड बसस्थानकाकडे जात असताना दुचाकीला भरधाव डंपरने धडक देऊन फरफटत नेल्याने प्रा.सुषमा आनंदा कीर्तने जागीच ठार झाल्या.

मलकापूरमध्ये दुचाकीला धडक देऊन भरधाव कार भाजी मंडईत



घुसली. कारने चिरडल्याने भाजी विक्रेती महिला जागीच ठार असून तीन महिला जखमी झाल्या.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कराड येथील यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेजमध्ये वनस्पतिशास्त्र विभागातील प्राध्यापिका सुषमा आनंदा कीर्तने या बुधवारी कॉलेज सुटल्यानंतर सायंकाळी सहाच्या सुमारास दुचाकीवरून बसस्थानकाकडे निघाल्या होत्या. त्यावेळी डंपरने त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक दिल्यानंतर डंपरने दुचाकीसह कीर्तने यांना दहा ते बारा फूट फरफटत नेल्याने त्या जागीच ठार झाल्या.

## हुंड्यासाठी विवाहितेचा छळ

# पतीसह सासरकडील चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – लग्नात ठरल्याप्रमाणे हुंडा आणि दागिने दिले नाहीत, या कारणावरुन एका ३२ वर्षीय विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून आणि 'भरोसा सेल'च्या अहवालानुसार वरुड पोलीस ठाण्यात पतीसह सासरच्या ४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार पीडित महिलेचे लग्न झाल्यानंतर



ती सासरी वात्सल्य नगर (नवे नांदेड) येथे नांदत होती. मात्र, लग्नात ठरल्याप्रमाणे ५० ग्रॅमचा सोन्याचा गोफ, बुलेट मोटरसायकल, सोन्याचे गंठण, इतर दागिने तसेच गादी, दिवाण व फर्निचर दिले नाही, या कारणावरुन सासूने तिला 'तू भिकाऱ्यासारखी माझ्या घरी आलीस' असे म्हणुन अपमानित केले.

सासरकडील जाच सहन न झाल्याने अखेर विवाहितेने दिलेल्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी पती स्वप्नील रावसाहेब दोरवे (३२), सासू अनिता रावसाहेब दोरवे (५५), सासरे रावसाहेब चंदर दोरवे (६०), दिर वैभव रावसाहेब दोरवे (३०) सर्व रा.वात्सल्य नगर, सिडको, नांदेड) याचेविरुध्द कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ बी.एन.एस.अन्वये गुन्हादाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

# तालुक्यात बकऱ्या चोरणारी टोळी सक्रिय

## चिंचरगव्हाण मधुन १ लाख ३९ हजार रुपयांच्या बकऱ्या चोरीला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – वरुड – तालुक्यात बकऱ्या चोरणारी टोळी सक्रिय झाली असून गेल्या दोन दिवसापूर्वी उदापूर येथील बकऱ्या चोरट्यानी लांपास केल्यानंतर पुन्हा काल दि.२४ च्या रात्री चिंचरगव्हाण येथील १ लाख ३९ हजार रुपये किमतीच्या १५ बकऱ्या गोठ्यातून चोरुन नेल्याची घटना घडली. या घटनेमुळे पशुपालकांमध्ये भितीचे वातावरण पसरले असुन पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.




गेल्या दोन दिवसापूर्वी उदापूर येथील चंद्रभान उभाळे यांच्या गोठ्यातून बोकडासह, २७ बकऱ्या असे एकूण १ लाख ४० हजाराचे पशु धन चोरट्यानी गोठ्यातून चोरून नेल्या होते. या घटनेनंतर चिंचरगव्हाण येथील रहिवासी विशाल वामनराव बांबल (३०) हे पशुपालकाच्या १५ बोकडासह बकऱ्या चोरट्यानी गोठ्यातून चोरुन नेल्या. विशाल बांबल हे पशुपालनाचा व्यवसाय करतात. त्यांच्याकडे २० बकऱ्या होत्या. त्यांचे वडील वामनराव बांबल हे बकऱ्यां चराई व त्यांची देखभाल करतात काल २४ च्या रात्री त्यांनी आपल्या बकऱ्या गावालागत राजुरा ते बाजार पवनी रस्त्यावरील गोठ्यात बांधून ठेवल्या. रात्री चारा पाणी करून ते घरी परतले. वडील वामनराव हे गोठ्यात झोपले होते. आज दि.२५ ला सकाळच्या सुमारास विशाल बांबल हे गोठ्यात बकऱ्यांना चारा देण्यासाठी गोठ्यात गेले असता त्यांना बकऱ्या कमी दिसून आल्या. त्यांनी वडिलांना उठवुन बकऱ्यांचा शोध घेतला मात्र बकऱ्या कुठेही दिसून आल्या नाही. गोठ्यात बकऱ्यांना बांधून ठेवलेले दोर कापले असल्याचे त्यांना दिसून आल्यानंतर एकूण २० बकऱ्यांपैकी ९ बकऱ्या, १ बोकड, ३ बोकडाची पिल्ले तर २ बकरीची लहान पिले असे एकूण १ लाख ३९ हजार हजार रुपये किंमतीची पिल्लासह ११ बकऱ्या व ३ बोकड चोरी गेल्याचे लक्षात आले. या घटनेची फिर्याद वरुड पोलीस स्टेशनला दिल्यावरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस तपास सुरु आहे. सदर बकऱ्या चोरीच्या घटनेमुळे पशु पालकांमध्ये भितीचे वातावरण पसरले असुन पोलिसांनी तातडीने चोरट्याचा शोध घ्यावा, अशी मागनि पशुपालकांकडून केली जात आहे.


# प्रशासक सरपंचांना अजून मोठा दणका, गोठवले ते महत्त्वाचे अधिकार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य यांच्या समितीला प्रशासक म्हणुन नेमण्याचे निर्देश सरकारने दिले होते. २० फेब्रुवारी २०२६ रोजी या विषयीची अधिसूचना सरकारने काढली होती. या विरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आलेली आहे. राज्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायत संदर्भात सादर केलेल्या प्रकरणात औरंगाबाद खंडपीठाने सुधारित अंतरिम आदेश दिले. त्यात सरपंचांचे आर्थिक अधिकार गोठवल्याचे समोर आले आहे.













स्वागत कमानीवर भगवा फडकवतांना विजेचा धक्का लागल्याने

# सोलापुरात २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**सोलापूर** – सोलापूर शहरातील गजबजलेल्या चौकात दुर्दैवी घटना घडल्याचं समोर आलं आहे. स्वागत कमानीवर भगवा झेंडा लावतांना विजेचा शॉक लागून एका तरुणाचा जागेवरच मृत्यू झाला. घरातील कर्त्या पुरुषाचा दुर्दैवी अंत झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

कुमठा नाका परिसरातील स्वागतनगर रोडवर बुधवारी सायंकाळी घडलेल्या अपघातात २४ वर्षीय तरुणाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. केतन रमेश पाटोळे असे भारतनगर येथे राहणाऱ्या मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. तरुण मुलाचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने केतन पाटोळेच्या आईची शुद्ध हरपली होती. यशवंत सोसायटी, स्वागतनगर येथील रस्त्यावर गुरुवारी होणाऱ्या कार्यक्रमानिमित्त मंडप उभारण्यात आला होता. मंडपासमोर स्वागत कमानही उभारण्यात आली होती. या कमानीवर झेंडा लावण्यासाठी केतन पाटोळे वर चढला होता. झेंड्यासाठी वापरण्यात आलेल्या कापडाला स्टीलचा पाइप जोडलेला होता. सुमारे २० ते २५ फूट उंच असलेल्या या कमानीच्या बाजूलाच उच्च दाब असलेली विद्युतप्रवाह वाहून नेणारी तार होती. झेंड्यासाठी वापरलेल्या कापडाला जोडलेला स्टीलचा पाइप आणि कमानीच्या अगदी शेजारी असलेली विद्युत तार यांचा संपर्क आला आणि क्षणार्धात सगळं संपलं. जोरदार विजेचा धक्का बसताच केतन सुमारे २० फूट उंचीवरुन खाली कोसळला. हा थरारक प्रसंग पाहून आजूबाजूचे तरुण हादरुन गेले.

# राज्यसभेच्या जागेवरून खडाजंगी? प्रियंका चतुर्वेदी संतापल्या का?



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – ऑपेरशन टायगर' राबवले जाणार असल्याच्या चर्चेदरम्यान उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या खासदारांची बैठक घेतली. काल झालेल्या या बैठकीत राज्यसभेची हक्काची जागा हातून गेल्यावरुन खडाजंगी झाल्याचे समजते. नेत्या प्रियंका चतुर्वेदी यांनी याप्रकरणी संताप व्यक्त केला.

शरद पवार यांना पाठिंबा दिल्याने राज्यसभेतील शिवसेनेची हक्काची जाग गेली असा सूर आळवल्या गेला. तर इतर खासदारांनी केलेल्या त्या मागणीमुळे आदित्य ठाकरेही नाराज झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. उद्धव ठाकरे यांनी काल खासदारांची बैठक बोल–ावली होती. त्यात उद्धव सेनेच्या खासदारांनी हजेरी लावली. या बैठकीची इनसाईड स्टोरी समोर आली आहे. या बैठकीत शरद पवार यांच्यासाठी शिवसेनेची हक्काची खासदारकीची जागा सुटल्याने प्रियंका चतुर्वेदी संतापल्याचे समजते. संजय राऊतांनी पवारांचं नाव का घेतलं? असा सवाल चतुर्वेदींनी उपस्थित केल्याची माहिती सूत्रांनी दिली. राज्यसभेच्या जागेसाठी उद्धव ठाकरे यांनी खर्गे आणि रमेश चेन्नीथला यांना फोन केल्याचे समजते.





